NAVJYOT /Vol. XII / Issue – I ISSN 2277-8063

# म. गांधीजींची स्त्रीत्व आणि लैंगिकते बद्दलची संस्कारीत आधुनिक विचारधारा

**सौ. आम्रपाली दि.रोहिदास,** (एम.ए.क्लिनिकल सायकॉलॉजी,PGDRP)

---

(म. गांधीजींची स्त्रीत्व आणि लैंगिकतेबद्दल असणारी संस्कारीत-आधुनिक विचारधारा आजच्या एकविसाव्या शतकातही नव्या पिढीला काही दिशा देऊ शकेल का?)

"It's easy to stand in the crowd, but it takes courage to stand alone." - Mahatma Gandhi

**विषय परिचय (प्रस्तावना) -**

"स्त्रीच्या गर्भातून पुरुषाचा जन्म झालेला आहे व तिच्याच मांसाचा व हाडांचा पुरुष बनला आहे. आपले जन्मसिध्द पद प्राप्त करून घ्या आणि तुमचा संदेश पुन: जगाला द्या."

म.गांधी,("स्त्री-जीवन")- खंड सहावा, महाराष्ट्र गांधी स्मारक निधी.

श्री. मोहनदास करमचंद गांधी ते महात्मा व राष्ट्रपिता उपाधी प्राप्त करण्यासाठी बापुजींना वैयक्तिक, सामाजिक, आध्यात्मिक, राजकीय, आर्थिक, तसेच भावनिक व मानसिक कसोट्यांवर खरे उतरावे लागले आहे. गांधीजी ही एक विचारधारा असावी म्हणूनच ती वैश्विक सीमा पार करू शकली. केवळ भारतीय स्वातंत्र्य चळवळी पुरते त्यांचे कार्य मर्यादित नव्हते तर मानवी जीवनाच्या अनेक कोनांना त्यांचा स्पर्श झालेला दिसून येतो. ज्यात प्रामुख्याने मानवी जीवन, मानवी हक्क, धर्म-संस्कार, स्वातंत्र्य, नैतिकता, शिक्षण, वर्ण भेद, जातीय ऐक्य, राजकारण, अर्थकारण, सामाजिक व्यवस्था, आधुनिकीकरण, सत्याग्रह,सत्य, अहिंसा, समानता, विवाह, लैंगिक शिक्षण तसेच अध्यात्म असे मनुष्य जीवनाचे अनेक पैलू त्यांच्या विचार मंथनातून लिखित-अलिखित स्वरूपातून व्यक्त झालेले आहेत.

गांधीजींची जीवन-निष्ठा ही यांच्या जीवनमुल्यांतून वारंवार प्रकट झालेली आहे. गांधीजीनी त्यांचे खाजगी आयुष्य समाजापासून कधीही लपविले नसल्यामुळे त्यांची सामाजिक छबी, व्यक्तिमत्व आणि मत विचार बरेच वेळा वादादित ठरलेले आहेत. (Prinka Bose, The South Asianist) गांधीजींचे विवाह, लैंगिक संबंध आणि व्यसनाधिनता या संदर्भातील त्यांचे वैयक्तिक अनुभव त्यांनी समाजाचा आडपडदा न ठेवता सत्यपणे व्यक्त केलेले आहेत. गांधीजी जरी जागतिक राजकारणात सक्रिय होते, जरी "महात्मा" होते जरी ते ब्रम्हचर्याचे पालन करत होते तरी यांनी स्त्री-पुरुष लैंगिक संबंधांच्या अनुषंगाने स्वत:वर, ब्रम्हचर्याचे प्रयोग केल्याची नोंद दिसून येते. तसेच त्या प्रयोगांतून त्यांनी ब्रम्हचर्याचे सिद्धांत मांडल्यांचेही नमूद आहे. (Vinay Lal, January 2000, Journal of The History of Sexuality)

या लैंगितकतेच्या म्हणजेच ब्रम्हचर्याच्या प्रयोगात त्यांच्या जवळील, नात्यातील तसेच आश्रमातील काही स्त्रियांचा सक्रिय सहभाग दिसून आला आहे. हे प्रयोग जरी गांधीजीनी इतर स्त्रियांबरोबर केले असले तरी ते प्रयोग यांनी स्वतः वर केलेले आहेत. यातून स्वनियंत्रणाची उच्चतम पातळी गाठण्यासाठी म्हणजे लैंगिक इच्छेवर संपूर्ण ताबा मिळविता यावा, यासाठी स्वतःला अनेक प्रसंगातून तपासून पाहण्याचा प्रयत्न केलेला दिसून येतो.

गांधीजींचे लैंगिकते संदर्भातले प्रयोग तसेच मते आणि स्त्री बद्दल त्यांची उच्चतम विचारसरणी ही त्यांच्या विवादीत प्रतिमे संदर्भातील आरोपांना काही अंशी अनुत्तरित करू शकतो. महात्मा गांधीजींचे स्त्रीच्या विशेषताः हिंदू स्त्री संदर्भातील विचार अथवा ठाम मते ही तत्कालीन भारतीय समाजातील रूढी-परंपरेच्या पेक्षा अधिक प्रगत होती. ज्यामध्ये व्यक्ती स्वातंत्र्य, स्त्री-शिक्षण, पुर्नविवाह, घटस्फोटाचा अधिकार, बाल विवाहास विरोध, हुंडा व पडदा पध्दतीस विरोध, देवदासी व वेश्या व्यवसायास विरोध, निर्णय स्वातंत्र्य इ. अशा अनेक मुद्द्यांना लगेच स्विकारण्याची मानसिकता ना त्यावेळच्या स्त्रिमध्ये असावी, ना त्यावेळच्या समाजात असावी असे वाटते. यासाठी बराच काळ लागणार आहे हे गांधीजींना माहित होते. तरी ही त्यांनी त्यांच्या लिखाणातून व भाषणांमधून यासाठी वारंवार जोरदार आग्रह धरलेला दिसतो तसेच त्याच्या ब्रम्हचर्याच्या प्रयोगांमुळेही ते नेहमी वाद-विवाद सापडलेले आहेत. ब-याच ठिकाणी त्यांच्या चारित्र्यावरच प्रश्न निर्माण केलेले दिसून येतात इतका भारतीय संस्कृती अथवा रूढी परंपराचा पगडा जनमानसात तसेच प्रसार माध्यमातून दिसून आलेला आहे.

त्यांचे सत्याचे प्रयोग म्हणजेच सत्याचा शोध घेण्याची वृत्ती सर्वत्र दिसून आलेली आहे. अगदी स्व-प्रतिमेचा विचार न करता स्वतःच्या चुका, विचार, भावना, कृतीतील सत्य जसेच्या तसे जगासमोर मांडणे, तसेच इतर विषयांवरही

आडपडदा न ठेवता स्पष्ट मते मांडणे, ब्रम्हचर्याच्या प्रयोगांच्याही नोंदी करणे, वा हे सर्व जाहीरपणे कबूल करणे हे त्यांच्यातील अध्यात्मिक गुरु, राजकीय संन्यासाचे दर्शन घडवते.

“मी महात्मा म्हटला गेलो म्हणून माझे वचन प्रमाण आहे असे समजून कोणी चालू नये. 'महात्मा' कोण हे आपल्याला माहीत नाही. म्हणुन चांगला मार्ग हा की ‘महात्म्याचे’ वचन देखील बुद्धीच्या कसोटीवर घासून घ्यावे आणि ते कसास न उतरल्यास त्याचा त्याग करावा!”

म.गांधी (गांधीजींची विज्ञापना-"स्त्री-जीवन” महाराष्ट्र गांधी स्मारक समिती)

**‘स्त्री' चे स्त्रित्व** - निसर्गाचे ‘सत्व’ - स्त्री (मादी) ही निसर्गाचे अव्याहत प्रतिनिधीत्व करत आहे. निसर्गातील पुनरुत्पादनाची महत्त्वाची जबाबदारी ती पेलते. स्त्रीचे स्त्रीत्व हे ती माता होण्यात अधिक आहे. कारण तीच केवळ नऊ महिन्यांचे गर्भारपण व प्रसुती वेदना सहन करू शकते. म्हणजेच स्त्री कडे उच्च कोटीची सहनशीलता, साहस त्याग, सेवा, धैर्य, वात्सल्य, प्रेम आणि नवनिर्मिती चे कसब निसर्गतःच आहे. त्यामुळे जितके थोर पुरुष झालेत ते स्त्रीच्या निर्मितीचा अविष्कार आहेत. तिच्याविना पुरुषांचे अस्तित्वच अशक्य आहे. (स्त्री-जीवन) त्यामुळे स्त्रीला तिच्या नैसर्गिक क्षमतांचा व गुणांचा उपयोग स्वतः बरोबरच जगाच्या कल्याणासाठी करता येईल असा दृष्टिकोन निर्माण करायला हवा.

* गांधीजीच्या मते," ज्या जातीत वा देशांत स्त्रीजातीला मान दिला जात नाही या देशाला सुसंस्कृत म्हणता येणार नाही.” म्हणजेच समाजाच्या प्रगतीसाठी तसेच देशाच्या विकासासाठी स्त्रीला समाजिक समाजातील रूढी-परंपरांच्या गुलामगिरीतून मुक्त होण्यास प्रयत्न केले पाहिजेत. पूर्वापार चालत आलेले तिचे शोषण, स्त्री-पुरुष समानतेस प्रोत्साहन देऊन कमी करण्याचा जोरदार प्रयत्न केला पाहिजे. मात्र स्त्री-पुरुष समानता केवळ सामाजिकच नाही, तर कायदयाच्या पातळीवरही आल्यास स्त्री वरील अन्यायांत घट होईल. वारसा हक्क, शिक्षण, अर्थाजन, विवाह, घटस्फोट, नोकरी-व्यवसाय, कौटुंबिक जबाबदा-या, सामाजिक जबाबदा-या, निर्णय स्वातंत्र्य इ. सारख्या अनेक घटकांवर या गांधीजीनी केव्हाच भाष्य केलेले दिसून येते. स्त्री-पुरुषांच्या हे परस्परपूरक असल्याने त्यांचे अस्तित्व एकमेकांवर अवलंबुन आहे. यामुळे दोघांनीही आपापल्या गुणांचा विकास केल्यास समाजाचा व त्या अनुषंगाने देशाचा विकास दिसून येईल. स्त्री एक पिढी घडवते तर एक सक्षम पिढी इतिहास घडवते.

स्त्री सबलाच आहे. तिला तिच्या आत्मशक्तीची जाणिव झाल्यास तसेच पुरुष मानसिकतेने तिची केलेली पिळवणूक थांबवल्यास, तसेच तिला शिक्षण, स्वातंत्र्य, आर्थिक अर्थाजनाची संधी दिल्यास, तिच्या इतकी सक्षम कोणी नसेल. स्त्री शौर्याचा इतिहास संपूर्ण जगाला माहित आहेच. मात्र तिच्या लैंगिकतेचे मांडलेले बाजारीकरण समाजातील सर्वच घटकांबरोबर खुद स्त्रीनेही थांबवले पाहिजे असे वाटते. ती एक शक्ती आहे हे जर देवतांना पुजनिय मानून सिद्ध होते. तसेच इतिहासातही याचे दाखले आहेत. तर ती शक्ती स्त्रीने स्वत:च्या प्रती तसेच समाज-देशाच्या प्रती जबाबदा-या घेऊन सिद्ध केली पाहिजे.

स्त्रीकडे असणारी सहनशीलता तसेच मर्यादांची समज याचा तिने पुरुषी स्वैराचाराला पायबंध घालण्यासाठी उपयोग केला पाहिजे. आपण कमी नाही असा कोणताही न्यूनगंड न बाळगता सर्व क्षेत्र स्व-जाणिव जागृत ठेऊन, आत्मभानाने तसेच स्वसंरक्षणाचे महत्व जाणून, वास्तविक विचारसरणीने पादाक्रांत केली पाहिजे.

स्त्रियांना शिक्षण तर मिळालेच पाहिजे मात्र याबरोबर तिला तिचे आरोग्य व स्वच्छता यासारख्या मुलतत्वांचे ज्ञान देणेही गरजेचे आहे. (स्त्री-जीवन) तसेच कमी वयात येणारे लैंगिक संबंध, लैंगिक शोषण, विवाह, मातृत्व, संसारिक जबाबदा-या,इ. चे शिक्षण दिल्याशिवाय स्त्री-शिक्षण पूर्ण होणार नाही. म्हणजेच केवळ शैक्षणिक अध्ययन स्त्रियांचे वैयक्तिक व सामाजिक गंभीर प्रश्न सोडवू शकत नाही असे वाटते. त्यासाठी इतर ज्ञानही उपलब्ध झाल्यास त्यांचा आत्मविश्वास वाढेल.

समाजातील रूढी-परंपरांचा जसा अभ्यास करून त्यामध्ये सकारात्मक बदल अपेक्षित आहेत. तसेच स्त्री-शिक्षण अथवा स्त्री- विकासासाठी प्रथम समाजातील स्त्रीचे स्थान, स्त्री-पुरुष संबंध, स्त्री प्रती समाजाचा दृष्टिकोन, स्त्रीचे महत्व, स्त्री-स्वातंत्र्य व स्त्रीचा समाजाप्रती दृष्टीकोन इ. सारख्या मुद्दयांचा अभ्यास प्रत्येक समाजानुसार केला पाहिजे.

स्त्रीच्या मर्यादा पहिल्या ठरविल्या जातात. पण ती किती अमर्यादीत प्रगती करू शकते, हे विचारातच घेतले जात नाही. त्यामुळे तिच्या मर्यादातच (ज्या समाजाला वाटतात) तिला संधी दिली जाते. त्यामुळे तिची प्रगती मर्यादीतच दिसून येते. या मर्यादांची जाणिव स्त्रीला जन्मापासून वारंवार करून दिल्याने ती या मर्यादांना वास्तव समजू शकते.

मुलतःच स्त्री कडे वात्सल्य असते म्हणून तिची कार्यक्षेत्रे मर्यादीत नाहीत. जर तिला अधिक ज्ञान दिले तर ती सर्वच क्षेत्रात कार्य करू शकते.

गांधीजींनी स्त्रीला केवळ स्त्री न समजता समाजातील एक घटक समजलेले होते. त्यामुळे तिच्या सर्वांगीण विकासावर यांनी भर दिला. याचबरोबर त्यांनी स्त्रीचा केवळ सीमीत विकास अपेक्षीत केला नाही. तर त्याची कारणमीमांसा स्पष्ट करून सर्वतोपरी विकासासाठी उपाययोजनाही मांडलेल्या दिसून येतात.

मात्र 'स्त्री' बद्दल असणारे अत्यंत आधुनिक विचारांबरोबरच म. गांधी स्त्रीला तिच्या मर्यादा,शील व संस्कारांचीही वारंवार जाणिव करून देताना दिसतात. स्त्री विकासासाठी असणारे अत्यंत वास्तविक व आधुनिक मतांबरोबरच काही मते विरोधाभास निर्माण करणारी वाटतात. जी आध्यात्मिक किंवा ब्रम्हचर्यावर नको इतका भर देणारी तसेच सामान्य लोकांसाठी अवास्तविक वाटण्यासारखी आहेत असे वाटते. ज्यामध्ये पती-पत्नी मधील लैंगिक संबंधात काम-वासना नसावीच, संततीसाठीच लैंगिक संबंध प्रस्थापित करावेत, विवाह हा संस्कार असल्याने कामवासना ठेऊ नये, संतती-नियमनाच्या साधनांच्या वापरास विरोध, शीलाची जपणूक किंवा लैंगिक संबंधांना घाण समजणे, इ.मते. ही मते आधीच्या मतांइतकी आधुनिक अथवा पुरोगामी वाटत नाहीत. या मागील गांधीजींची धारणा लक्षात घेऊन त्यातील संभाव्य धोक्यांसाठी ही उपाययोजना असावी असे जरी समजले तरी ती सर्वसमावेशक व व्यावहारिक वाटत नाही आहेत.

**लैंगिकता आणि लैंगिक संबंध-**

"पहिल्या मुलाचे मनुने 'धर्मज' म्हणजे धर्मभावनेने निर्माण झालेले आणि नंतरच्या संततीचे 'कामज' म्हणजे वासनेने जन्माला आलेले" असे वर्णन केलेले आहे. एवढ्याने थोडक्यात स्त्री-पुरुष-संबंधाचा कायदा समजून येतो.' - म. गांधी (स्त्री-जीवन, महाराष्ट्र गांधी स्मारक निधी)

गांधीजींचे बालविवाह, आंतरजातीय विवाह, शिक्षण, जातीय भेदाभेद, तत्कालीन रुढी-परंपरा, आर्थिक स्तर, शारीरिक-मानसिक आरोग्य, व्यक्ती स्वातंत्र्य, संतती, मासिक पाळी, घटस्फोट अशा अनेक बाबतीतली यांची मते ही लैंगिक संबंध आणि लैंगितकेबद्दलच्या मतांपेक्षा अत्यंत आधुनिक वाटतात.

गांधीजींच्या भूतकाळातील एक प्रसंग ज्यात गांधी त्यांच्या वडिलांच्या शेवटच्या घटकेच्या वेळी आपल्या पत्नी बरोबर समागममध्ये व्यस्त होते व त्यामुळे ते स्वतः च्या वडिलांना मृत्युसमयी भेटू शकले नव्हते. हा प्रसंग गांधींच्या लैंगिक संबंधा बद्दलच्या मानसिकतेत बदल करणारा ठरू शकेल असे वाटते. कारण या प्रसंगाचा खेद त्यांनी वारंवार उल्लेखित केलेला दिसतो. त्यांचे लैंगिक संबंधाबद्दल असणा-या विचारांवर अध्यात्मिकतेचा प्रभाव अधिक दिसून येतो असे वाटते.

"पती-पत्नी मधील नाते हे व्दैतांत अद्वैत किंवा अद्वैतांत व्दैत असे असते." - म.गांधी.

जरी अत्यंत उच्च कोटीचे हे विचार दिसून आले की जे अनेक मानवी विकारांना नियंत्रीत करतील किंवा संसारिक छोट्या-मोठ्या अडीअडचणींना प्रतिबंध करू शकतील. पण हे अंमलात आणण्यास किंवा त्यांची खोली समजून अंगिकार करण्यास अनेक मर्यादा आहेत असे वाटते.

मात्र अनेक विवाह काही प्रमाणात समाधानकारक व सुसह्य होतील जर गांधीजींच्या काही सहज शक्य असणा-या विचारांना सामान्य पातळीवर आणण्याचा यत्न होऊ शकला तर. जसे पती-पत्नीमध्ये मैत्रीचे संबंध, पारदर्शकता, प्रामाणिकपणा, एकमेकांप्रती आदर, समानता, कौटुंबिक जबाबदा-यांची समान वाटणी, एकमेकांवर समान हक्क, व्यक्ती स्वातंत्र्य, एकमेकांची काळजी, एकमेकांप्रती कर्तव्ये, सामंजस्य, आर्थिक सुरक्षितता तसेच कोणतीही हिंसा किंवा शोषण न करणे, इ.

तरीही समागमास वा लैगिंकतेस अध्यात्मिक दृष्टिकोनातून संपूर्णताः पाहणे अशक्य वाटू शकते. मात्र लैंगिक संबंधाबद्दल असणारी विकृत मानसिकता तसेच लैंगिक शोषणास पाया घालण्यासाठी या विचारातील काही विचारांना प्राधान्य देता येऊ शकेल.

जसे स्त्री शरीर हे उपभोग्य वस्तू नाही, ती गुलाम नाही, लैगिक संबंध तिच्या इच्छेविरुद्ध असू नयेत, स्त्री मनोरंजनाचे साधन नाही, तिलाही लैंगिक स्वातंत्र्य आहे, इ.

**ब्रम्हचर्य -** “ब्रम्हचर्ययुक्त वैवाहिक जीवनास मी स्वाभाविक समजतो. जननेंद्रियांचे प्रजोत्पादन हेच एकमेव आणि उदात्त कार्य आहे, ही कल्पना एकदा स्त्री-पुरुषांच्या मनात दृढ झाली म्हणजे मग दुस-या कोणत्याही हेतूने संबंध करणे हे आपल्या वीर्य शक्तीचा दुरुपयोग करण्याचा गुन्हा करण्यासारखे आहे. (म. गांधी - स्त्रीजीवन)

1906 साली म. गांधींनी ब्रम्हचर्याची शपथ घेतली होती. म. गांधीजींच्या मते, ब्रम्हचर्य हे ब्रम्हाला शोध घेणे होय. ज्यामुळे मनावर व त्यायोगे शरीरावर नियंत्रण मिळविणे शक्य होते. ब्रम्हचर्य हे शरीर, मन आणि आत्म्याचे संरक्षण कवच आहे. (सत्याचे प्रयोग, एम. के. गांधी, प्रकरण 61, ब्रम्हचर्य 2)

ब्रम्हचर्याचे किंवा स्वतःच्या लैंगिक वासनांवर नियंत्रण मिळविण्यासाठीचे गांधीजींचे प्रयोग ज्यात नग्न स्त्रियांबरोबर झोपणे, स्त्रियांकडून सेवा अथवा मालिश, आंघोळ घालून घेणे असे अनेक वादादीत मुद्दे अनेकदा चर्चिले गेलेत. मात्र गांधीजींनी या संदर्भात दिलेल्या माहितीनुसार तसेच गांधीजीची भूतकाळातील वर्तणूक, त्यांचे पहिल्यापासून नोंदविलेले विचार व मते यांचाही संबंध लावता येऊ शकतो अथवा यातील सत्य-असत्याच्या वादापेक्षा, सद्य-स्थितीतीत यातून चांगले काय घेता येऊ शकेल याचा विचार करता येऊ शकतो, असे मला वाटते.

आज घडीला अनेक गोष्टी आहेत त्या किशोरांपासून वृद्धापर्यंत सगळ्यांना लोभात पाडू शकतात.

केवळ लैंगिकच नाही तर चैनीसाठी अनेक प्रलोभने बाजारात उपलब्ध आहेत. ब्रम्हचर्यातून केवळ असुरक्षित लैंगिक संबंधावरच नाही तर जंकफुड, व्यसने, सोशल मिडीया, कपडे, तसेच इतर चंगळवादी भोगवाद वाढविण्याच्या गोष्टींवर जरी काही अंशी ताबा मिळविता आला किंवा त्यात योग्य-अयोग्याची समज आली तरी व्यक्तीचे बरेच नुकसान वाचेल.

* आज मनोरंजनाच्या क्षेत्रात स्त्री शरीराचा सुरू असलेला बाजार केवळ योग्य वैचारिक बैठक असेल तरच थांबवता येवू शकेल असे वाटते. जर ब्रम्हचर्याच्या प्रयोगातील एक मुद्दा जो स्त्री शरीराकडे अत्यंत नैसर्गिकपणे पाहणे. सामान्यत: लोक समजतात नग्न स्त्री शरीर केवळ आणि केवळ वासना विकारच निर्माण करते, या दृष्टिकोनाला बदलण्यास हे प्रयोग उपयुक्त ठरू शकतात.

* पुरुषाचे पौरषत्व लिंगात आहे, असा समज गांधींजी लैंगिकतेच्या प्रयोगातून बदलण्याचा प्रयत्न करतात. स्त्रीला पुरुषाच्या पुरुषत्वाची भिती वाटू नये असे होण्यासाठी प्रयत्न केला पाहिजे.

* अखेरीस प्रत्येक व्यक्तीला मर्यादा आहेत. त्याचे माहात्म हेच आहे की ते सत्य मान्य करतात. मानवी मनातील वासना विकार शरीरामार्फत पूर्ण केले जातात. त्यामुळे या वासना विकारांमागील गरज व सत्यता तपासून घेतली तर शारीरिक नियंत्रण मिळविता येईल नाहीतर पशू व मनुष्यात फरक राहणार नाही.

गांधीजींनी सत्याचा मार्ग दाखविला आहे. तो त्यांनी मनुष्य म्हणून किती पादाक्रांत केला, हे इतिहासातील साक्षी नमुद करत असल्यातरी आज आपण या ज्ञानाचा सत्य, अहिंसा, ब्रम्हचर्य आणि समानता याबाबतीत किती प्रमाणात अंमलात आणू शकतो? हे तपासून पाहिल्यास अनेक प्रश्नांची वास्तविक उत्तरे मिळतील. मात्र ती स्विकारणे गरजेचे आहे !

**References -**

1.“स्त्री-जीवन”, महाराष्ट्र गांधी स्मारक निधी, त्र्यं. शि. भारदे गांधीभवन, पुणे - 1960.

2.Priyanka Bose, The South Asiansit, Vol 3, PP. 137-177

3.Vinay Lal, Nakedness, Nonviolence, and Brahmacharya: Gandhi's Experiments in celibate sexuality, Journal of the History of sexuality, vol: 9, Dec., 2009.

4.Tham Wolf, Gandhi's Brahmacharya : A brief note on Gandhi and His women. Associates, oikos Worldviews Bulletin, Volume 4, 2004.

5.M.K. Gandhi, An Auto Biography - The story of my Experiments with Truth, Navajivan Publishing House, Ahmedabad, India.

6.M.K. Ganelhi, Key to Health, Navajivan Mudranalaya, Ahemadabad, Dec., 1954.

7.BBC News, Gandhi wanted women to 'resist' sex for pleasure’,1 4th September,2018.

8.Google

9.Wikipedia.